निविदा सूचना 1/26

| सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,नागपूर विभाग,नागपूर | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | पदाचे नाव | भरावयाचे पदसंख्या | पदाचे स्वरूप | शैक्षणिक अर्हता |
| १ | शिपाई | ०२ | कंत्राटी स्वरूपात(करार तत्वावर)पूर्णवेळ अकुशल पद | दहावी उत्तीर्ण,उपलब्ध नसल्यास शैक्षणिक अर्हता शिथिल करण्यात येईल |
| २ | पहारेकरी | ०१ | कंत्राटी स्वरूपात(करार तत्वावर)पूर्णवेळ अकुशल पद | दहावी उत्तीर्ण,उपलब्ध नसल्यास शैक्षणिक अर्हता शिथिल करण्यात येईल |

वरिल विषयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निविदा प्रक्रीयेच्या अटी व शर्ती ठरविण्यात आलेल्या आहेत.

१) निविदेसोबत जोडलेले सर्व कागदपत्रे साक्षांकित असावेत.

२) खाजगी कर्मच्याऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनेची रक्कम प्रचलित दरानुसार मुख्य मालक म्हणून या कार्यालयातर्फे आपल्या दरात समाविष्ठ करून त्याचा भरणा सबंधित कार्यालयात केल्याची पावती या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

३) खाजगी कर्मचाऱ्यांची वयोमर्यादा कमीत कमी १८ वर्षे व जास्तीत जास्त ४५ वर्षे राहील.

४) शिपाई, पहारेकरी या पदाकरीता दहावी उत्तीर्ण ,उपलब्ध नसल्यास अर्हता शिथिल करण्यात येईल. याप्रमाणे अर्हता असली तरी बारावी उत्तीर्ण असल्यास व पदवीधर असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

५) व्यसनाधीन गुन्हेगारीशी पार्श्वभूमी असणाऱ्या खाजगी कर्मचाऱ्यास नियुक्ती देता येणार नाही. त्याबाबतीत कर्मचाऱ्यांना नियुक्ती देण्यापूर्वी चरित्र पडताळणी करुन घेणे बंधनकारक राहील.

६) बेशिस्त वर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यास या कार्यालयाने निर्देशित केल्यावर त्वरित काढून टाकण्यात येईल.

७) खाजगी कर्मचाऱ्याना साप्ताहिक सुटटी देण्यात येईल व किमान वेतनामध्ये साप्ताहिक सुटटीचा समावेश केला जाईल.

८) खाजगी कर्मचाऱ्यांना अपघात झाल्यास खर्चाची पूर्तता करण्याची जबाबदारी ही सदर खाजगी कर्मचाऱ्यास नेमुन दिलेल्या कंत्राटदाराची राहील.

९) नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यास मिळणारे कोणतेही फायदे, सुविधा सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना देय असणार नाही.

१०) कुठलेही कारण न देता कुठल्याही वेळी कंत्राट रद्द करण्याचे सर्व अधिकार धर्मादाय सह आयुक्त, नागपूर यांना असतील.

११) ठेकेदार/कंपनी/संस्थेतर्फे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व या कार्यालयावर राहणार नाही.

१२) बाह्ययंत्रणेव्दारे निविदा प्रक्रियेला प्रशासकिय व वित्तीय मान्यता प्राप्त झाल्यावर नेमूण देण्यात येणा–या खाजगी कर्मचा–याच्या कंत्राटदारास या कार्यालयासोबत लेखी करार करावा लागेल.

१३) उपरोक्त पदाच्या सेवेसाठी प्रत्येक खाजगी कर्मचाऱ्याकरिता आकारण्यात आलेला दर हा किमान वेतन कायदा १९४८ प्रमाणे असेल. तसेच, नियमितपणे पद निर्मित केली असता जितका खर्च आला असता त्या खर्चाच्या कमीत कमी २० ते ३० टक्के बचत होईल अशा पध्दतीने प्रत्येक पदासाठी मानधन कंत्राटदाराने निविदेत नमूद करावे.

१४) निविदा अर्ज पांढऱ्या कागदावर टंकलिखित करुन ज्या पदासाठी निविदा भरण्यात येत आहे, त्या पदाचे नाव **"शिपाई पदासाठी निविदा"/"पहारेकरी पदासाठी निविदा"** असे ठळक अक्षरात नमूद करणे आवश्यक आहे तसेच निविदेसोबत संस्था/कंपनी/एजन्सी शासनमान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.

१५) सदरील निविदा सूचना (http:Charity.maharashtra.gov.in) संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

वरिल प्रमाणे निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती ठरविण्याबाबत समितीमार्फत विचार विनिमय करण्यात आला. वरिल सर्व बाबींना समितीने एकमताने मंजुरी दिलेली असून ठराव संमत करण्यात आलेला आहे.

कार्यालयामध्ये कंत्राटदार/ठेकेदार/कंपनी/संस्थेकडून यांच्याकडुन निविदा मागवून बाहययंत्रणेव्दारे पदे भरणे बाबत निविदा प्रक्रिया कार्यक्रम राबविणे बाबत विचार विनिमय करण्यात येत आहे. त्याप्रमाणे निविदा प्रक्रिया कार्यक्रम खालीलप्रमाणे ठरविण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रम:

| अ.क्र. | तपशील | दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| १ | जाहीर निविदा सूचना काढणे | १२/०२/२०२६ | |
| २ | जाहीर नोटीस प्रसिध्द करणे(कार्यालयीन नोटीस बोर्ड, जिल्हा माहिती कार्यालय, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नागपूर) | १६/०२/२०२६ | |
| ३ | मा. धर्मादाय आयुक्त यांचे संकेतस्थळावर(http:Charity.maharashtra.gov.in) प्रसिध्द करणे | १७/०२/२०२६ | |
| ४ | निविदा स्वीकारणे कालावधी | १८/०२/२०२६ ते ०२/०३/२०२६ | |
| ५ | निविदा स्वीकारणे अंतिम तारीख | ०२/०३/२०२६ | |
| ६ | निविदा उघडण्याची मुदतवाढ तारीख | ०५/०३/२०२६ | |
| ७ | निविदा उघडल्यास आदेशानुसार तुलनात्मक तक्ता तयार करणे | ०६/०३/२०२६ | |
| ८ | मा. धर्मादाय सह आयुक्त नागपूर यांच्याकडे समितीचा अहवाल सादर करणे | ०९/०३/२०२६ | |
| ९ | मा. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्फत शासनास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करणे | मा.ध.स.आ. यांच्या मंजुरीनंतर | |

Date :- 12/2/2026

Ahole 12.2.2026
(आभा अ. फोलके)
न्यायाय सह आयुक्त
नागपूर

OCC.